# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ३१३/२०२४ दिनांक- १९/०८/२०२४.

**"अनाधिकृतरित्या मिरारोड व नयानगर पोलीस ठाण्याचे हद्दीत वास्तव्यास असलेल्या ०५ बांगलादेशी महिला नागरिकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई"**

दिनांक १७.०८.२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना बातमीदारामार्फत एव्हरशाईन वुड बिल्डींगच्या पाठीमागील झोपडपट्टी, बेवर्ली पार्करोड, तसेच न्यु मिरा पॅराडाईस बिल्डींगचे पाठीमागील झोपडपट्टी, गितानगर, या ठिकाणी बांगलादेशी नागरीक वास्तव्यास आहेत तसेच जैन मंदीर, अंबर स्विट मार्ट जवळ मिरारोड पुर्व या ठिकाणी कामासाठी बांगलादेशी नागरीक येतात अशी बातमी मिळाली असून ते विनापरवाना राहत असल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस पथक, पंच व दुभाषिक यांचेसह साफळा रचुन एव्हरशाईन वुड बिल्डींगच्या पाठीमागील झोपडपट्टी, बेवर्ली पार्करोड, तसेच न्यु मिरा पॅराडाईस बिल्डींगचे पाठीमागील झोपडपट्टी, गितानगर, तसेच जैन मंदीर, अंबर स्विट मार्ट जवळ मिरारोड पुर्व या ठिकाणी बांगलादेशी नागरीक विनापरवाना राहत असल्याची तसेच कामासाठी येत असल्याची माहिती मिळाल्याने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दोन पंचासमक्ष वर नमुद ठिकाणी छापा टाकुन ०५ बांगलादेशी महिलाना ताब्यात घेवुन त्यांचेकडे केलेल्या चौकशीत ते बांगलादेशी नागरीक असल्याची कबुली दिल्याने सदर बाबत दोन पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करुन ताब्यात घेवून बांगलादेशी नागरीकांविरुध्द सरकार तर्फे मिरारोड व नयानगर पोलीस ठाण्यात सरकारतर्फे फिर्याद दाखल करुन मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा क्र. २६१/२०२४ व नयानगर पोलीस ठाणे गुन्हा क्र. ३५४/२०२४ पासपोर्ट (भारतात प्रवेश) अधिनियम १९२० चे कलम ३, ४ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १३,१४-अ (ब) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाचे पोनि समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, रामचंद्र पाटील, शिवाजी पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/केशव शिंदे, पोशि/चेतनसिंग राजपुत मपोशि/अश्विनी भिलारे, मपोशि/शितल जाधव, चा.पोहवा/सम्राट गावडे सर्व नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

-------------0000-------------